I J R S S I S, Vol. (IX), Issue (1) Jan 2023: 436-440
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# आधुनिक व्यवस्थापनात लोक कल्याणाकरिता नागरी सहकारी पत संस्थाचे महत्व

मधुकर नक्षीणे
शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश**
सहकार या शब्दात एकूण दोन शब्द आहेत. एक सह म्हणजे एकत्र व दुसरा कार म्हणजे काम करणे. यावरुन सहकाराचा साधा अर्थ एकत्र काम करणे होय. सहकारी संस्थेत येणारे लोक आपल्या समान गरजा भागविण्यासाठी येत असून त्यांच्यात काटकसर, स्वावलंबन, परस्पर सहाय्य आणि स्वार्थ, त्याग इत्यादी चांगल्या गोष्टीचा अतंभाव असतो. उपरोक्त गुण असणारी व्यक्ती आर्थिक, सामाजिक व नैतीक ध्येयासाठी स्वखुशीने एकत्र आलेले असतात. समान हक्क, समान दर्जा व नफा, तोटयाची योग्य वाटणी ही तत्वे मान्य करुन सहकारी संस्थांची निर्मिती झालेली असते.

सहकार ही यशस्वी जिवनाची गुरुकिल्ली आहे. सहकार ही केवळ मानवी नव्हे तर पशुपक्षा पासूनची प्रवृत्ती आहे.. पशुपक्षी सुध्दा कळप करुन राहतात. मानव सुध्दा त्यांच्या पशुतुल्य अवस्थेत थवेच्या थवे करुन राहत होते. संरक्षणा करिता व स्वविकासाकरिता सहकारा शिवाय उध्दार नाही तसेच “बिना सहकार नही उध्दार” अशी हिंदीत म्हण प्रचलित आहे.

प्रा. मोहमद युनुसयांनी बांगला देशामध्ये गरीबातील गरीब व्यक्तीला तसेच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या गरीब व्यक्तीला मदत करण्याच्या दृष्टीने मिनी बँक, पत संस्था तसेच बचत गटाची निर्मिती करुन त्यांना सुक्ष्म पत पुरवठा करुन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले त्यामुळे त्यांना अविस्मरणीय कार्य केल्याबद्यल आंतरराष्ट्रीय नोबल पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे. सर्व सामान्य नागरिक अथवा जनता बॅंके पर्यंत त्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता पोहचू शकत नाही. त्यामुळे राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात सर्व साधारण लोक येत नाहीत. परंतु नागरी पत संस्थांच्या निर्मितीमुळे सर्व साधारण व्यक्ती सुध्दा आपला विकास साधण्याचा निश्चित प्रर्यत्न करतो व राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात येवून आपला विकास साध्य करतो. सहकार उद्येशाप्रमाणे व सहकार तत्वानी नागरी पत संस्थाच्या परिसरात राहत असणाऱ्या जनतेला अर्थ सहाय्यकरुन त्यांचा विकास केलो जातो.

२१ व्या शतकाच्या देशात सहकारी पत संस्थानी आपली फार मोठी ओळख निर्माण केली. प्राथमिक कृषी पत संस्था, जिल्हा मध्यवर्ती बॅंका, राज्य सहकारी बॅंका आणि दिर्घकालीन वित्तपुरवठा करणाऱ्या राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बॅंका व पत सस्था मुख्यता अस्तीत्वात आल्यात. स्वातंत्र्योत्तर काळात बॅंक व्यवसायाच्या विकासासाठी तसेच पत संस्थाच्या विकास धोरणाबाबत शासनानी फार मोठया प्रमाणात पर्यत्न केले.

आधुनिक व्यवस्थापनात नागरी पत संस्थाना विकासाचे साधन म्हणून बघितले जाते सर्वसाधारण नागरी पत संस्थात जनतेकडून तसेच सभासदांकडून ठेवी स्विकारुन व कर्जे देणे ही पत सस्थांची कार्यप्रणाली समजली जाते. परंतु या कार्यासोबतच पत संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय विकासाच्यादृष्टीने विविध योजना राबविल्या जातात. त्यामुळे रोजगार निर्मिती होत असते अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज लोकांना तसेच सभासदांना दिले जाते.

**बिजशब्द :** सहकार, ऐच्छिक संघटन, काटकसर, सभासदांचा विकास

**प्रस्तावना :**

सहकार या शब्दात एकूण दोन शब्द आहेत. एक सह म्हणजे एकत्र व दुसरा कार म्हणजे काम करणे. यावरुन सहकाराचा साधा अर्थ एकत्र काम करणे होय. सहकारी संस्थेत येणारे लोक आपल्या समान गरजा भागविण्यासाठी येत असून त्यांच्यात काटकसर, स्वावलंबन, परस्पर सहाय्य आणि स्वार्थ, त्याग इत्यादी चांगल्या गोष्टीचा अतंभाव असतो. उपरोक्त गुण असणारी व्यक्ती आर्थिक, सामाजिक व नैतीक ध्येयासाठी स्वखुशीने एकत्र आलेले असतात. समान हक्क, समान दर्जा व नफा, तोटयाची योग्य वाटणी ही तत्वे मान्य करुन सहकारी संस्थांची निर्मिती झालेली असते.

सहकार ही यशस्वी जिवनाची गुरुकिल्ली आहे. सहकार ही केवळ मानवी नव्हे तर पशुपक्षा पासूनची प्रवृत्ती आहे.. पशुपक्षी सुध्दा कळप करुन राहतात. मानव सुध्दा त्यांच्या पशुतुल्य अवस्थेत थवेच्या थवे करुन राहत होते. संरक्षणा करिता व स्वविकासाकरिता सहकारा शिवाय उध्दार नाही तसेच “बिना सहकार नही उध्दार” अशी हिंदीत म्हण प्रचलित आहे.

प्रा. मोहमद युनुसयांनी बांगला देशामध्ये गरीबातील गरीब व्यक्तीला तसेच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या गरीब व्यक्तीला मदत करण्याच्या दृष्टीने मिनी बॅंक, पत संस्था तसेच बचत गटाची निर्मिती करुन त्यांना सुक्ष्म पत पुरवठा करुन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले त्यामुळे त्यांना अविस्मरणीय कार्य केल्याबद्यल आंतरराष्ट्रीय नोबल पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे. सहकारी चळवळ १६ व्या शतकात सुरु होवून सुरवातीला ब्रिटन व फ्रान्स लोक कल्यानाकरिता सहकाराच्या माध्यमातून कार्य करु लागली. सहकार कायदा १९६१ च्या नियमा नुसार सहकार क्षेत्र ग्रामीण स्तरापासून ते शहरी भागापर्यंत फार मोठे जाळे पसरलेले आहे असे दिसुन येत आहे. सर्व सामान्य नागरिक अथवा जनता बॅंके पर्यंत त्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता पोहचू शकत नाही. त्यामुळे राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात सर्व साधारण लोक येत नाहीत. परंतु नागरी पत संस्थांच्या निर्मितीमुळे सर्व साधारण व्यक्ती सुध्दा आपला विकास साधण्याचा निश्चित प्रर्यत्न करतो व राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात येवून आपला विकास साध्य करतो. नागरी पत संस्था वार्डा पासून ते तालुका तसेच जिल्हा स्तरावर नागरी पत संस्थाची नोदंणी जिल्हा सहायक निबंधक कार्यालयातून सभासदांच्या कल्याणाकरिता व विकासाकरिता एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या सहकार उद्येशानी सहकारी पत संस्थाची निर्मिती झाली आहे. सहकार उद्येशाप्रमाणे व सहकार तत्वानी नागरी पत संस्थाच्या परिसरात राहत असणाऱ्या जनतेला अर्थ सहाय्यकरुन त्यांचा विकास केलो जातो.

भारत हा शेतीप्रधाण व ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित असलेला देश असल्याने अशा ग्रामीण वित पुवरठयात सहकारी पत सस्थांचे स्थान महत्वाचे आहे. २१ व्या शतकाच्या देशात सहकारी पत संस्थानी आपली फार मोठी ओळख निर्माण केली. प्राथमिक कृषी पत संस्था, जिल्हा मध्यवर्ती बॅंका, राज्य सहकारी बॅंका आणि दिर्घकालीन वित्तपुरवठा करणाऱ्या राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बॅंका व पत सस्था मुख्यता अस्तीत्वात आल्यात. स्वातंत्र्योत्तर काळात बॅंक व्यवसायाच्या विकासासाठी तसेच पत संस्थाच्या विकास धोरणाबाबत शासनानी फार मोठया प्रमाणात पर्यत्न केले.

आधुनिक व्यवस्थापनात नागरी पत संस्थाना विकासाचे साधन म्हणून बघितले जाते सर्वसाधारण नागरी पत संस्थात जनतेकडून तसेच सभासदांकडून ठेवी स्विकारुन व कर्जे देणे ही पत सस्थांची कार्यप्रणाली समजली जाते. परंतु या कार्यासोबतच पत संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय विकासाच्यादृष्टीने विविध योजना राबविल्या जातात. त्यामुळे रोजगार निर्मिती होत असते अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज लोकांना तसेच सभासदांना दिले जाते.

बिजशब्द : सहकार, ऐच्छिक संघटन, काटकसर, सभासदांचा विकास

**सहकारांचा अर्थ व व्याख्या :**

एच. कलव्हर्ट: “व्यक्तीने स्वेच्छेने एकत्र येवून स्वताच्या आर्थिक हितसंबंधाच्या संवधर्नासाठी समानतेच्या भूमिकेवर आधारित निर्माण केलेले संघटन म्हणजे सहकार होय.”

मॅक्लेगन समिती : “असंघटीत आणि शक्तिहीन लोकांनी एकमेकाच्या सहकार्याने व मनोधर्याने एकसंघ होवून श्रीमंत व प्रबळ लोकांच्या साधनाच्या वापराव्दारे नैसर्गिक क्षमता वाढवून विकसित केलेली संघटना किंवा संस्था होय.”

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या शब्दात : “सर्वांच्या हितासाठी, सर्वांच्या सहकार्याने उभारण्यात आलेले संघटन म्हणजे सहकार होय.”

**सहकाराची वैशिष्टये :**

१. सहकार ही काही व्यक्तींची सघटना आहे.

२. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांनी एकत्रित येवून सहकारी संस्था स्थापन करुन सहकाराचा पाया घातला आहे.

३. सहकाराची स्थापना संयुक्त व्यवहारातून होते.

४. सहकार संस्थेचा कारभार निस्वार्थ भुमिकेतून केला जातो.

५. सहकार संस्थेची जवाबदारी सर्वच सभासदावर असते.

६. सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात लाभ दिला जातो.

७. सहकार म्हणजे स्वेच्छेने एकत्रित आलेल्या व्यक्तींची संघटना आहे.

८. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी सहकार चळवळ उपयोगी आहे.

९. सभासदांना सहकारामध्ये समान दर्जा प्राप्त होतो. त्याची उद्दिष्टे समान असतात

१०.सहकार म्हणजे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ आहे.

११. सहकारी संस्थेचा मुख्य उद्येश संस्थेच्या सभासदांचे आर्थिक हित जोपासणे आहे.

१२. सस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालतो आणि एक व्यक्ती एक मत असा नियम प्रचलीत आहे.

१३. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकार चळवळ उदयास आली.

१४. सहकारामधील सभासदांची जात, धर्म, पंत, गरीब व श्रीमंत असा भेदभाव करण्यात येत नाही.

१५. सहकार हा भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांना जोडणारा महत्वपूर्ण आर्थिक दुवा आहे.

१६. सहकारी संस्थेला कंपनीप्रमाणेच स्वतंत्र अस्तित्व असते.

१७. सभासदांच्या नैतिक मुल्यांना विशेष महत्व देण्यास येते.

**सहकाराची तत्वे :**

१. ऐच्छिक आणि खुले सभासदत्व

२. लोकशाहीचे नियंत्रण

३. भांडवलावर मर्यादित लाभांश

४. व्यवहाराच्या प्रमाणात लाभाशांचे वाटप

५. सहकाराचे शिक्षण

६. रोखीचे व्यवहार

७. राजकिय व धार्मिक व्यवहार आणि ग्राहक संरक्षणाचे तत्व

८. प्रचार प्रसिध्दी तत्व

९. परस्पर सहकार्य आणि स्वावलंबन

१०. काटकसर

**महाराष्ट्रातिल सहकारी चळवळ :**

भारतात सहकारी चळवळीला दिशा देण्यात महाराष्ट्र राज्याचा बहुमोल वाटा आहे. राजकिय, सामाजिक, शैक्षणीक, औद्योगिक, शेती अशा विविध क्षेत्रात महाराष्ट्र हे पुढारलेल्या राज्यापैकी एक आहे. या क्षेत्रात सहकाराचे योगदान हे मोठया प्रमाणात आहे. १९ व्या शतकाच्या अखेरिस अनेक योजना राबविण्यास आल्या. शासनाच्या उपाय योजना सोबतच मुंबई राज्यात संस्थानामधील प्रा. कवठेकरांनी १९८८ मध्ये स्थापन केलेल्या सहाय्यक सहकारी मंडळी या संस्थेचा उल्लेख केल्याजातो. १९११ मध्ये शेतीला पतपुरवठा करण्यासाटी मुंबई सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बॅंकेची स्थापना करण्यात आली. कालांतराने मुंबईचे रुपांतर महाराष्ट्र राज्य को–ऑपरेटिव्ह बॅंकेमध्ये करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी कै. वैकुंठभाई मेहता यांच्या प्रेरणेने स्वातंत्र्यपूर्व काळात सहकारी तत्वावर खरेदी विक्रीचे प्रयत्न करण्यात आले. यामध्ये कोपरगांव येथील गोदावरी प्रवरा खरेदी विक्री संघ बारामती येथील निरा कॅनॉल खरेदी विक्री यांचा विशेष उल्लेख आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर कै. वैकुंठभाई मेहता, कै. पद्‌मश्री विखे पाटील, कै. डॉ. धनंजय गाडगीळ यांच्या प्रयत्नाने सहकारी तत्वावर चालणारा पहिला साखर कारखाना १९५० मध्ये प्रवरानगर येथे उभारण्यात

आला असून सहकारी कारखान्याची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने रोवली गेली. महाराष्ट्रात २२६ सहकारी सुतगिरण्या २८५३ सभासद, ७४० सहकारी हातमाग संस्था ७६८ सहकारी यंत्रमाग संस्था, २२०६६ प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था २३६२ प्राथमिक मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, ३२ मत्स्य व्यवसाय संघ, १ मत्स्य व्यवसाय महासंघ २३३२ प्राथमिक कुक्कटपालन संस्था, ६६६ नागरी सहकारी पतसंस्था आहेत.

**सहकार चळवळीचा इतिहास :**

१. इंग्लडमधील सहकार चळवळ : सहकार या संकल्पनेचा उदय इंग्लडमध्ये १६ व्या शतकाच्या सुरवातीला झाला. इंग्लडमध्ये १७६० ते १८४० या काळात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीमूळे तेथील लोकांच्या राजकीय, सामाजिक, व आर्थिक परिस्थितीत मूलगामी बदल घडून आले. १८४४ मध्ये रॉशडेल येथील २८ विणकर एकत्र येवून रॉशडेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी स्थापन करुन सहकार तत्वावर एका ग्राहक भांडाराची सुरुवात केली.

२. जर्मनितील सहकार चळवळ : एफ. डब्लू. रायफयझन व फॅन्झ शुल्झ यांनी जर्मनितील सहकार क्षेत्राची सुरुवात केली. गोरगरीब, दुर्बल शेतकरी व कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याकरीता या दोघांनी जर्मनीत सहकारी तत्वावर चालणाऱ्या सहकारी संस्था सुरु केल्या.

३. इस्त्राइल मधील सहकारी चळवळ : इस्त्राईल मध्ये ज्यू जमातीच्या लोकांनी लिंबू व संत्रा उत्पादकांनी उत्पादनाची विक्री करण्यासाठी सहकारी संस्थेची स्थापना केली.

४. डेन्मार्कमधील सहकार चळवळ : डेन्मार्क हा युरोपिय देशातील सर्वात लहान असलेला देश आहे. १८८२ मध्ये स्टिवींग ॲन्डरसन यांच्या पुढाकाराने एक दुग्ध उत्पादक सहकारी संस्था सुरुवात करण्यात आली.

**निष्कर्ष :**

१. सहकार तत्वावर निर्माण झालेल्या सहकारी संस्था गरीब व्यक्तीना आर्थीक मदत करीत असतात.

२. ना नफा ना तोटा या तत्वानी सहकरी पत संस्था जनतेची सेवा करीत असतात.

३. सहकारी संस्था ऐच्छीक संघटन आहे.

४. वार्डापासून ते तालूका तसेच शहरी भागात व जिल्हा स्तरावर सहकारी संस्थाची निर्मीती केली जाते.

५. सभासदांच्या विकासाकरिता पत पूरवठा संस्थेतून केल्या जातो.

६. शासकिय कार्यालयात सुध्दा कर्मचाऱ्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याकरिता सेवायोजकांच्या कर्मचारी पत संस्था निर्माण झालेल्या आहेत.

७. अल्प मुदती कर्ज, दिर्घ मुदती कर्ज तसेच औद्योगिक कर्ज सुध्दा सहकारी संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाते.

८. सभासदामध्ये बॅंकेत ठेवी ठेवण्याची व काटकसर करण्याची भावना निर्माण होते.

९. सभासदामध्ये जात, पात, धर्म पाहल्या जात नाही.

१०. सभासदांमध्ये सामाजिक जवाबदारीची जाणीव निर्माण होते.

**शिफारशी :**

१. राष्ट्रीय प्रवाहात सर्व सामान्य जनतेला आणण्याकरिता सहकार चळवळीच्या माध्यमातून शासनाने योग्य ते पर्यत्न करावे.

२. सहकार तत्वातून स्थापन होणाऱ्या महिला बचत गटांना लघू उद्योग निर्माण करण्याकरिता शासनाने आर्थिक मदत करावी.

३. सहकार तत्वानी निर्माण होणाऱ्या दुग्ध उत्पादक संघाना शासनाने सहकार्य करावे.

४. जिल्हा निबंधक व तालूका सहायक निबंधक यांच्या माध्यमातून सर्व सहकारी संस्थावर नियंत्रण ठेवावे.

५. सहकारी संस्था उपविधी व सहकार नियमानुसार चालत नसतील तर त्यावर कठोर कार्यवाही सुध्दा करावी.

६. सभासदांच्या ठेवी सुरक्षीत राहतील या दृष्टीने संस्थाचे अंकेक्षण करुन ठेव विमा काढण्यास संस्थेला बंधण कारक करावे.

OPEN ACCESS


७. ज्या संस्था सभासदांचे व ठेवीदारांचे हित जोपासणार नाही त्यांच्यावर कार्यवाही सुध्दा करावी.

८. सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कार्य विधीवर नियंत्रण ठेवावे.

९. नफ्यांच्या उद्येशाने सहकारी संस्था स्थापन झालेली नसावी.

१०. गोरगरीब, दुर्बल घटकांच्या सेवेकरिता व आर्थिक मदतीकरीता सहकारी संस्थांची स्थापना झाली पाहिजे.

**संदर्भ :–**

विपणन व्यवस्थापन – श्री. मुकूल ए. बुरघाटे

सहकार तत्वे आणि व्यवहार – प्रा. ए. आर. रायखेलकर

दै. लोकमत

दै. तरुण भारत

दै. देशोन्नती

दै. सकाळ

दै. लोकसत्ता

इंटरनेट.